महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

महाराष्ट्र शासन उपक्रम (सीआयएन: यु४०१००एमएच२००५एसजीसी१५३६४८)
एच.डी.आय.एल. टॉवर, ए विंग, ४ था मजला, बांद्रा(पूर्व), मुंबई-४०० ०५१.
दूरध्वनी क्र. ९१-९२-२६५८२४२४ विस्तारीत क्र.३५२
website:www.mahagenco.in Email ID-ciro@mahagenco.in

क्र : औसं/वैद्यकीय विमा २०२४-२५/ 488/ No 1 1 5 2 1 दिनांक:- 11 NOV 2024

परिपत्रक

विषय : MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०२४-२५ बाबत.

******

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy सन २०२४-२५ या कालावधीकरिता मुळ राशीभूत विमा रक्कम रु. ०५.०० लाख व Compulsory Increased Sum Insured रु.०५.०० लाख अशी एकूण रु.१०.०० लाखांपर्यंत कार्यान्वित करण्याकरिता मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.मं.सुत्रधारी कंपनी मर्यादित तथा अपर मुख्य सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र राज्य यांनी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, महानिर्मिती व महापारेषण तसेच चारही कंपन्यांचे संचालक (वित्त) व संचालक (मासं), महावितरण, महापारेषण तसेच कार्यकारी संचालक (मासं), महानिर्मिती व कार्यकारी संचालक (वित्त), महावितरण यांच्याशी विचारविनिमय करुन मंजूरी दिलेली आहे.

MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy: २०२४-२५ ची ठळक वैशिष्ट्ये :
(योजनेचा कालावधी दि. २६.१०.२०२४ ते दि.२५.१०.२०२५)

१. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy चा क्रमांक **मूळ राशीभूत विमा रक्कम रु.०५.०० लाख (५९००००/४८/२०२५/३४६८) व Compulsory Increased Sum Insured रु.०५.०० लाख (५९००००/४८/२०२५/३४७०)** असून या योजनेचा कालावधी दि.२५.१०.२०२४ च्या मध्यरात्रीपासून म्हणजेच दि.२६.१०.२०२४ (००:०० तासापासून) ते दि.२५.१०.२०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत (२४:०० तासांपर्यंत) असा एक वर्षाचा आहे.

२. सदर योजना **म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्या. अंतर्गत महानिर्मिती कंपनीमध्ये दि. २६ ऑक्टोंबर २०२४ रोजी सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील जास्तीत जास्त ०५ सदस्यांसाठी मुद्दा क्र.३.१ मधील कुटुंबाच्या व्याख्येनुसार लागू राहील.** तसेच, सर्व संचालक, प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी आणि महानिर्मिती कंपनीमधील **पदविका / पदवी प्रशिक्षण अभियंते** तसेच निम्नस्तर लिपीक (मासं/वित्त) सेवक पध्दतीने नियुक्त झालेल्या सर्वांना लागू राहील.

३. सदर योजनेतंर्गत वैद्यकीय विमा संरक्षण हे कर्मचारी व त्याच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील खाली नमूद कुटुंबाच्या व्याख्येतील सदस्यांपैकी कर्मचाऱ्याने निर्देशीत केलेल्या कोणत्याही ०५ सदस्यांसाठी **मूळ राशीभूत विमा रक्कम रु. ०५.०० लाखांपर्यत राहील.** तसेच **रु. ०५.०० लाखांपुढील रु. ०५.०० लाखांकरिताचा Compulsory Increased Sum Insured अशा प्रकारे एकूण विमा रक्कमेचे संरक्षण रु. १०.०० लाखांपर्यंतचे राहील.**

३.१ कुटुंबाची व्याख्या :-

- कर्मचारी / अधिकारी यांची पत्नी किंवा पती.
- कर्मचारी / अधिकारी यांवर अवलंबित असणारी औरस मुले/ सावत्र मुले / कायदेशीर दत्तक घेतलेली मुले.
  (तथापि, विमा कंपनीच्या नियमानुसार अवलंबित मुलांच्या बाबतीत खालील अटी लागू राहतील.
  - १८ वर्षापेक्षा जास्त वय असलेला मुलगा / मुलगी नोकरी करत असल्यास अथवा मुलगी विवाहीत असल्यास त्यांना अवलंबित समजण्यात येणार नाही.
  - तथापि, २६ वर्षापर्यंत वय असलेल्या मुलाचे शिक्षण सुरु असेल व तो कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित असेल तर अशा मुलाला अवलंबित समजण्यात येईल.
  - मुलगी अविवाहीत असल्यास तिचा विवाह होईपर्यंत ती कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अवलंबित आहे असे समजण्यात येईल.
  - कर्मचाऱ्यांवर संपूर्णपणे अवलंबून असलेली मतीमंद अथवा अपंग मुले.
- कर्मचारी/अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेले कर्मचारी/अधिकारी यांचे आई-वडील, **महिला कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून आणि त्यांच्याबरोबर राहत असलेल्या त्यांच्या आई-वडीलांची किंवा सासु-सासऱ्यांपैकी एकाचीच निवड करता येईल.**
- कर्मचारी/अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या १८ वर्ष वयाखालील अविवाहीत भाऊ.
- कर्मचारी/अधिकारी यांच्यावर पूर्णपणे अवलंबून असलेल्या अविवाहीत बहिणी व घटस्फोटीत अथवा विधवा बहिणी, यांच्याबाबत त्यांचे वय लक्षात घेऊ नये.
- या नियमाखालील प्रतिपूर्ती करण्यासाठी, कर्मचारी/अधिकारी यांची अंशकालीन नोकरी व्यतिरिक्त अन्य नोकरीस असलेली मुले आणि अविवाहीत मुली लाभदायक नोकरीत असल्याचे समजण्यात येईल आणि ती त्यांच्यावर अवलंबून असल्याचे मानण्यात येणार नाही. कर्मचारी/अधिकारी यांच्यावर अवलंबून असलेल्या आईवडीलांचे दरमहा किमान उत्पन्न अथवा मुळ निवृत्ती वेतन रु.५०००/- पर्यंत आहे असे आईवडील तसेच घटस्फोटीत/विधवा बहीण हे कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहेत असे समजण्यात येईल.

४. MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy योजनेमध्ये खालील काही अटी व शर्तीचा समावेश करण्यात आलेला आहे.

(अ) अतिरिक्त लाभांच्या सुविधा :-

- वैद्यकीय उपचारा दरम्यान रुग्णालयात कर्मचारी मयत झाल्यास अशा प्रकरणामध्ये वैद्यकीय उपचाराच्या खर्चाच्या (योजनेच्या अटी व शर्तीनुसार पात्र असलेल्या विमा दाव्यांची) सर्व रक्कमेची मंजूरी (एकूण विमा रक्कम रु.१०.०० लाख मर्यादेपर्यंत) तातडीने रुग्णालयास TPA मार्फत कळविण्यात येवून डिस्चार्ज देण्याची कार्यवाही करण्यात येईल. **सदर तरतूद फक्त कर्मचाऱ्यांकरीता लागू राहील.**

  ((Tender Clouse No.5.19) No Deduction in case of death during hospitalization for Employee only claims: Full claim payable without deduction for Non-medical expenses or any other expenses if the claim is eligible subject to SI & Compulsory Top up)

- जन्मजात आंतर व बाह्य व्यंगामुळे जीवनास धोका निर्माण होत असलेल्या प्रकरणी करावयाच्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची रक्कम रु.१०.०० लाख मर्यादेपर्यंत या योजनेमधून अदा करण्यात येईल.

  ({Tender Clouse no. ५.१४} External congenital in case of life threatening conditions to be covered upto Full SI & Compulsory Top up.)

(ब) **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy च्या योजनेमध्ये खालील अटी व शर्तीचा समाविष्ट करण्यात आलेला आहे:**

(I) <u>तक्रार निवारण यंत्रणा :</u>

• वैद्यकीय विमा योजनेच्या वैद्यकीय दाव्यासंदर्भातील विविध तक्रारीचे तातडीने निरासन करण्याच्या दृष्टीने सांघिक कार्यालय तसेच, विद्युत केंद्र/विभागीय कार्यालय यांच्या स्तरावर तक्रार निवारण यंत्रणा सुरू करण्यात येत असल्याने, कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय विमा योजनेसंदर्भातील तक्रारीकरीता इतर ठिकाणी दाद मागण्यापूर्वी आपली तक्रार संबंधीत तक्रार निवारण यंत्रणेकडे सादर करावी.

सदर तक्रारीबाबत कर्मचाऱ्यांचे समाधान न झाल्यास कर्मचाऱ्यांनी इतर ठिकाणी त्यांच्या तक्रार सादर करण्यापूर्वी आपली तक्रार दि. ओरिएंटल इन्शुरन्स कं.लि., पुणे यांना अग्रेषित करून त्याची प्रत मेडि असिस्ट हेल्थ केअर प्रा.लि.,(टिपीए) पुणे व संबंधीत विद्युत केंद्र/विभागीय कार्यालये/सांघिक कार्यालय यांना देऊन त्याबाबत संमती घ्यावी. **संबंधीत विमा कंपनी व TPA कंपनी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या तक्रारीचे निरासन ३० दिवसांमध्ये करून, कर्मचाऱ्याला त्याबाबत प्रतिउत्तर न दिल्यास कर्मचाऱ्यांना इतर ठिकाणी त्यांच्या तक्रारीसाठी दाद मागण्याकरीता संमती मिळाली असे समजण्यात येईल.**

• वर नमूद केल्यानुसार तक्रार निवारण यंत्रणेच्या दृष्टीने सांघिक कार्यालय व विद्युत केंद्र स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

<u>सांधिक कार्यालयातील तक्रार निवारण यंत्रणेचे समिती सदस्य</u>

१. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
२. औद्योगिक संबंध अधिकारी
३. दि. ओरिऐन्टल इन्शुरन्स कंपनी लि. चे प्रतिनिधी
४. मेडि असिस्ट हेल्थकेअर प्रा.लि. (TPA) चे प्रतिनिधी
५. कर्मचारी प्रतिनिधी

<u>विद्युत केंद्र स्तरावर तक्रार निवारण यंत्रणेचे समिती सदस्य :-</u>

१. संबंधीत विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता
२. उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी
३. कल्याण अधिकारी/सहा. कल्याण अधिकारी
४. मेडि असिस्ट हेल्थ केअर प्रा. लि., (TPA) चे प्रतिनिधी (विद्युत केंद्र/विभागीय कार्यालयासाठी नियुक्त करण्यात आलेले नोडल ऑफीसर)
५. कर्मचारी प्रतिनिधी

<u>विभागीय कार्यालय स्तरावर तक्रार निवारण यंत्रणेचे समिती सदस्य :-</u>

१. संबंधीत विभागीय कार्यालय प्रमुख
२. संबंधीत मासं विभागाचे प्रमुख
३. मेडि असिस्ट हेल्थ केअर प्रा. लि., (TPA) चे प्रतिनिधी (नजीकच्या विद्युत केंद्रासाठी नियुक्त करण्यात आलेले नोडल ऑफीसर)
४. कर्मचारी प्रतिनिधी

उपरोक्त समिती ०३ महिन्यातुन एकदा वैद्यकीय विमा योजनेच्या वैद्यकीय दाव्यांसंदर्भातील प्राप्त तक्रारींचे तातडीने निरसन करण्याच्या दृष्टीने बैठक घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही करतील.

(II) वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल होताना मेडि असिस्ट (TPA) या कंपनीस आगाऊ सुचना देणेबाबत.

- **कर्मचाऱ्याने Non Cashless प्रकरणांमध्ये** त्याच्या किंवा कुटूंबातील सदस्याच्या वैद्यकीय उपचारासाठी **रुग्णालयात दाखल झाल्यानंतर ४८ ते ७२ तासांच्या आत मेडि असिस्ट (TPA) या कंपनीस त्याबाबतची आगाऊ सुचना देणे (ई-मेल - msebmediclaim@mediassist.in) बंधनकारक राहील.** कर्मचाऱ्यांनी अशा प्रकारची **आगाऊ सुचना न दिल्यास वैद्यकीय प्रतिपूर्तीच्या देय असलेल्या देयकांमधून १० टक्के दंडनीय रक्कम (Penalty) विमा कंपनीमार्फत कपात करण्यात येईल.**
- **प्रतिपूर्तीच्या प्रकरणांमध्ये (Non Cashless) रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संपूर्ण मूळ प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करणे अनिर्वाय राहील. रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत प्रस्ताव सादर न केल्यास अशा प्रकरणी संपूर्ण प्रस्ताव नामंजूर करण्याचे अधिकार विमा कंपनीस राहील.**
- **कर्मचाऱ्यांनी मेडिक्लेम योजनेकरीता आपल्या कुटूंबातील अवलंबित सदस्यांची माहिती वर नमूद ३.१ मधील कुटुंबाच्या व्याख्येनुसार व १+५ सदस्यांच्या मर्यादेपर्यंत महानिर्मिती कंपनी Employee Portal च्या माध्यमातून सोबत जोडलेल्या कार्यपध्दतीनुसार Online पध्दतीने दि. ३०.११.२०२४ पर्यंत सादर (Submit) करणे अनिर्वाय आहे. सदर कालावधीमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नसून Offline पध्दतीने देखील कर्मचाऱ्यांना अवलंबितांच्या नावांचा समावेश अथवा त्यामध्ये बदल कोणत्याही परिस्थितीत करता येणार नाही, याची कर्मचाऱ्यांनी दक्षता घ्यावी. यास अपवादात्मक म्हणून फक्त मेडिक्लेम योजनेच्या कालावधीत नव्याने रुजू झालेले कर्मचारी, नवविवाहीत कर्मचारी व जन्मजात शिशुंचा योजनेमध्ये समावेश करता येईल.**

<u>टिप</u> : *सदर माहिती भरताना कर्मचाऱ्यांने दक्षता घेवून आपल्या कुटुंबातील अवलंबित संदस्यांची नांवे अचूक भरावीत. सदर माहिती तपासाअंती चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास सदर कर्मचाऱ्यावर कंपनीच्या नियमानुसार कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.*

तद्नंतर **नव्याने रुजू झालेले कर्मचारी, नवविवाहीत कर्मचारी व जन्मजात शिशु यांचा योजनेमध्ये समावेश करण्यासाठी ६० दिवसांच्या आत कागदपत्रांच्या पुराव्यासह संबंधीत विद्युत केंद्र/विभागीय कार्यालय/सांधिक कार्यालयाच्या मानव संसाधन विभागाद्वारे ciro@mahagenco.in या ईमेलवर कळविणे बंधनकारक राहील.)**

५. सदर योजनेंतर्गत Cashless or Non - Cashless वैद्यकीय उपचार घेण्यासाठी रुग्णालयामध्ये दाखल झाल्यानंतर उपचारासाठी देण्यात येणाऱ्या कक्षांचे (Room Rent) दर खालीलप्रमाणे राहतील.

- **सामान्य कक्ष (General Room)** : **1% of Sum Insured 5 Lakh (Rs. 5000/-) or actual expenses whichever is less.**
- **अति दक्षता विभागातील कक्ष (ICU Room)** : **2% of Sum Insured 5 Lakh (Rs. 10000/-) or actual expenses whichever is less.**
- वरील कक्षांचे (Room Rent) दर हे In case of emergency (Emergency means Life Threating), Trauma, Accident (On Duty/Road) अशा प्रकरणामध्ये शिथील करण्यात आलेले आहेत.
- वर नमूद केलेले कक्षांचे (Room Rent) दर हे मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५.०० लाख पूर्णपणे संपुष्टात आल्यानंतर Compulsory Increased Sum Insured रु. ०५.०० लाखांकरीता व कर्मचाऱ्यांनी ऐच्छिकपणे घेतलेल्या Additional Valuntory Top Up करिता देखिल योजनेच्या अटी व शर्तीनुसार लागू राहतील.

६. या योजनेमध्ये आजारांवरील वैद्यकीय खर्चांची मर्यादा (Diseasewise Capping) काढण्यात आलेली आहे. परंतु, डोळयाच्या शस्त्रक्रियेसाठी (Cataract Operation including Laser Treatment) करिता प्रति डोळा रु.४५०००/-ची मर्यादा आहे.

७. (अ) या योजनेमध्ये कर्मचाऱ्यास किंवा त्यांच्या अवलंबितास पूर्वी असलेल्या आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे. (Pre-existing Diseases Covered)

ब) या योजनेमध्ये पहिल्या ३० दिवसांपर्यतचा कालावधी शिथिल करण्यात आला आहे. (First 30 days waiting period waived off)

(क) तसेच, योजना सुरु झाल्यापासून पहिल्या ०२ ते ०४ वर्षापर्यंतचा प्रतिक्षा कालावधी शिथिल करण्यात आलेला आहे.(First 02 to 04 years waiting period waived off)

८. या योजनेतंर्गत रुग्णालयामध्ये दाखल होण्यापूर्वी ३० दिवसांपूर्वीचा व रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतरच्या ६० दिवसांपर्यंत केलेल्या उपचारासाठीच्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देय आहे. (Pre hospitalisation upto 30 days and post hospitalisation upto 60 days Covered)

९. मेडिक्लेम योजनेमध्ये जन्मजात मुलाचा समावेश पहिल्या दिवसापासून (Baby day-one cover) करण्यात आलेला आहे.

१०. विविध आजारांकरीता व विशेषत: कॅन्सर आजाराच्या उपचारासाठी Modern/Advance/ Robotic surgeries तसेच Targeted Therapy, Adjurant Chemotherapy and Advance Oral Chemotharapy (Tablets) यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

११. या योजनेमध्ये आर्युवेदीक उपचार जर शासकीय रुग्णालय अथवा शासकीय रुग्णालयाशी सलग्न शासकीय महाविद्यालयात घेतले असल्यास त्याची प्रतिपूर्ती देय राहील.

टिप : Day Care मधील सर्व वैद्यकीय उपचारांसाठी किमान MBBS डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेणे बंधनकारक राहील. अन्यथा वैद्यकीय उपचारांची प्रतिपुर्ती मिळणार नाही.

१२. कार्यरत कर्मचाऱ्यांकरिता मेडीक्लेम योजना सन २०२४-२५ करिता मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५.०० लाख व त्यापुढील Compulsory Increased Sum Insured रु.०५.०० लाख अशी एकूण रु.१०.०० लाखांची मेडिक्लेम योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. Compulsory Increased Sum Insured तसेच Additional Voluntory Top Up याकरिता मेडिक्लेम योजनेच्या अटी व शर्ती ह्या मूळ योजनेप्रमाणेच राहतील.

मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५.०० लाखांकरीता आणि Compulsory Increased Sum Insured रु.०५.०० लाखांकरीता कार्यरत अधिकारी/कर्मचारी तसेच सर्व प्रशिक्षणार्थी अभियंता यांच्या मासिक वेतनातून माहे नोव्हेंबर -२०२४ ते ऑक्टोंबर -२०२५ या कालावधीमध्ये मानव संसाधन विभागामार्फत खालीलप्रमाणे रक्कम कपात करण्यात येईल.

अ) मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५.०० लाखांकरिता दरमहा रु.८२६/- (GST सह) व Compulsory Increased Sum Insured रु.०५.०० लाखांकरिता दरमहा रु.२२०/- (GST सह) अशी एकूण रु.१०.०० लाखांकरिता विमा रक्कम दरमहा रु.१०४६/- (GST सह) राहील. सदर रक्कम कर्मचाऱ्यांच्या माहे नोव्हेंबर -२०२४ ते ऑक्टोंबर-२०२५ च्या वेतनातून दरमहा कपात करण्यात यावी.

ब) जर कर्मचारी माहे ऑक्टोंबर-२०२४ मध्ये सेवानिवृत्त/मयत झाल्यास त्यांच्या शेवटच्या वेतनातून मागील योजनेची उर्वरित रक्कम रु.१२३८/- व सद्यस्थितीत चालू असलेल्या योजनेची वार्षिक विमा रक्कम रु.१२५५२/- अशी एकूण रु.१३७९०/- एकरकमी रक्कम कपात करण्यात करावी. तद्नंतरच सेवानिवृत्त/मयत कर्मचाऱ्यांना व त्याच्यावरील अवलंबित सदस्यांना या योजनेचा लाभ दि.२५.१०.२०२५ पर्यत मिळेल.

क) माहे नोव्हेंबर-२०२४ ते सप्टेंबर - २०२५ या कालावधीमध्ये सेवानिवृत्त किंवा मयत होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या वेतनातून मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५.०० लाखांकरिता दरमहा रु.८२६/- (GST सह) व Compulsory Increased Sum Insured रु.०५.०० लाखांकरिता दरमहा रु.२२०/- (GST सह) अशी एकूण रु.१०.०० लाखांकरिता विमा रक्कम दरमहा रु.१०४६/- (GST सह) प्रमाणे उर्वरित रक्कम एकरकमी कपात करण्यात यावी. तद्नंतरच सेवानिवृत्त/मयत कर्मचाऱ्यांना व त्याच्यावरील अवलंबित सदस्यांना या योजनेचा लाभ दि.२५.१०.२०२५ पर्यत मिळेल.

ड) उपरोक्तप्रमाणे मेडीक्लेम योजनेसाठी कर्मचाऱ्यांकडून वैयक्तिकपणे अदा करण्यात येणारी विमा हप्ता रक्कम आयकर कायद्याच्या कलम -८० (ड) नुसार सवलतीसाठी पात्र राहील.

१३. वर नमूद केल्यानुसार दरमहा वेतनातून कपात करण्यात आलेली व Additional Voluntory Top Up विमा हप्त्याची एकरकमी कपात केलेली रक्कम महानिर्मिती कंपनीच्या मुख्य महाव्यवस्थापक (लेखा.) यांच्या निर्देशानुसार GL Code-२८४०२ या खाते शिर्षकाखाली (Account Head) जमा करण्यात यावी.

१४. म.रा.वि.मं. सुत्रधारी कं.मर्या व महानिर्मिती कंपन्यांतील कर्मचाऱ्यांची सदर योजनेच्या कालावधीमध्ये सेवा समाप्ती (Termination) झाल्यास किंवा कर्मचाऱ्याचा राजीनामा स्विकारल्यास अशा कर्मचाऱ्यास व त्याच्या अवलंबितास या योजनेचा लाभ उर्वरित कालावधीसाठी घेता येणार नाही. मात्र, सदर योजनेसाठी महानिर्मिती कंपनीने कर्मचाऱ्यांच्या वतीने विमा कंपनीकडे योजना सुरु होताना विमा हप्ता अदा केलेला असल्याने सदर कर्मचाऱ्यांच्या शेवटच्या देय रक्कमेतून रु. १०४६/- दरमहा प्रमाणे माहे ऑक्टोबर - २०२५ पर्यंतची उर्वरित रक्कम एकरकमी कपात करुन घेण्यात यावी.

सबब, ज्या - ज्या सक्षम अधिकाऱ्यांमार्फत सेवा समाप्ती किंवा राजीनामा प्रकरणी आदेश निर्गमित करण्यात येतील अशा प्रकरणांची माहिती संबंधीत विद्युत केंद्र/विभागीय कार्यालयांच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाने (सांघिक कार्यालयाकरिता प्रकरण परत्वे संबंधीत मुख्य महाव्यवस्थापक/ मुख्य अभियंता यांच्या विभागांमार्फत) दरमहा तातडीने मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना ईमेलद्वारे ciro@mahagenco.in यावर पाठवावी. वर नमूद केल्यानुसार संबंधीत कर्मचाऱ्यांची माहिती (निरंक असेल तरीही) दरमहा न कळविल्यास सदर बाबत जबाबदारी निश्चित करण्यात येवून यानुषंगाने, कंपनीवर येणाऱ्या आर्थिक भाराची वसूली संबंधीत प्रकरणी जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१५. कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांना Medi Assist (TPA) कंपनीच्या नेटवर्क रुग्णालयामध्ये (महानिर्मिती कंपनीच्या Employee Portal (http://esevarth.mahagenco.in) अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली List of Hospitals यामध्ये नेट वर्क रुग्णालयांची यादी पहावयास मिळेल) वैद्यकीय उपचारासाठी कॅशलेस सेवेचा लाभ मिळेल. तसेच विना नेटवर्क रुग्णालयामध्ये उपचार घेतल्यास सदर योजनेच्या अटी व शर्तीच्या अधीन राहून वैद्यकीय उपचाराची अनुज्ञेय प्रतिपूर्ती दि ओरिंएटल इन्शुरन्स कंपनी लि., पुणे या विमा कंपनीकडून Medi Assist (TPA) कंपनीच्या मार्फत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात अदा केली जाईल.

<u>टिप</u> : प्रतिपूर्तीच्या प्रकरणांमध्ये (Non Cashless) रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत संपूर्ण मूळ प्रस्ताव विमा कंपनीकडे सादर करणे अनिर्वाय राहील. रुग्णालयातून डिस्चार्ज झाल्यापासून ३० दिवसांपर्यंत प्रस्ताव सादर न केल्यास अशा प्रकरणी संपूर्ण प्रस्ताव नामंजूर करण्याचे अधिकार विमा कंपनीस राहील.

१६._<u>मेडिक्लेमचा लाभ घेण्यासाठी उपलब्ध विविध पर्याय:-</u>

महानिर्मिती Employee Portal अंतर्गत Mediclaim या शिर्षकाखाली Mediclaim enrollment /E-card या link वर गेल्यास आपण **Portal.mediassist.in** या **Medi Assist Health Care TPA Pvt.Ltd** यांच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून आपणास खालील पर्याय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

- View your policy details
- Track Claim in real-time
- Download your E-Cards
- Get help and whenever you need it
- Search Network Hospital

१७. Additional Voluntory Top Upचा विमा हप्ता वेतनातून कपात करण्याचे संमती पत्र देणेबाबत:

ज्या कर्मचाऱ्यांना मूळ राशीभूत विमा रु.०५.०० लाखांपर्यंत + Compulsory Top up रू. ५.०० लाखांपर्यंत अशी एकूण विमा रक्कम रु.१०.०० लाख रक्कमेपेक्षा जास्त रक्कमेचा अतिरिक्त विमा (Additional Top Up) घ्यावयाचा असल्यास कर्मचाऱ्यांना विमा रक्कम रु.०१.०० लाख ते रु.१०.०० लाख यापैकी खालील एका विकल्पाची निवड दि. २२.११.२०२४ पर्यंत सोबत जोडलेल्या **Option Form** भरुन संबंधीत मानव संसाधन विभागाकडे सादर करावयाची आहे.

कर्मचाऱ्यांच्या माहे नोव्हेंबर-२०२४ च्या वेतनातून Additional Top Up ची कपात केलेली रक्कम **विमा कंपनीस अदा केलेल्या तारखेपासून Additional Top Up योजनेचा लाभ कर्मचारी व त्याच्या परिवारास घेता येईल व एकदा कपात झालेली रक्कम कर्मचाऱ्याला परत मिळणार नाही वेतनातून कपात झालेली रक्कम सांघिक कार्यालयाद्वारे विमा कंपनीस माहे डिसेंबर - २०२४ मध्ये अदा करण्यात येउन त्याचा लाभ विमा कंपनीस रक्कम अदा केल्याच्या तारखेपासून पुढे एक वर्षाच्या कालावधीसाठी देय राहील हि बाब कर्मचाऱ्यांनी सोबत जोडलेल्या Option Form भरताना लक्षात घ्यावी.**

<u>टिप</u> : *एकदा Submit केल्यानंतर कोणत्याही स्थितीत सदर रक्कम परत करण्यात येणार नाही.*

तसेच, जर कर्मचाऱ्याच्या वेतनातून खालील दर्शविलेल्या **Additional Voluntory Top Up** ची विमा रक्कम एकरकमी कपात होत नसल्यास, अशा कर्मचाऱ्यांनी Money Receipt मार्फत **GL code - 28402** या शिर्षकाखाली दि.३०.११.२०२४ पूर्वी भरणा केलेली Money Receipt औद्योगिक संबंध विभागाच्या ई-मेलवर **ciro@mahagenco.in** पाठवावी. दि.३०.११.२०२४ नंतर भरणा केलेल्या Money Receipt बाबत कोणताही विचार केला जाणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी कर्मचाऱ्याची असेल.

Additional Voluntory Top Up विकल्प रु. ०१.०० लाख ते रु. १०.०० लाख करिता ऐच्छिक वार्षिक विमा हप्ता.

रु. ०५.०० लाख BSI + रु. ०५.०० लाख Compulsory Increasd Sum Insured विमा रक्कमेपुढील	संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (GST सह) रुपयांमध्ये	रु. ०५.०० लाख BSI + रु. ०५.०० लाख Compulsory Increasd Sum Insured विमा रक्कमेपुढील	संपूर्ण वर्षाकरिता विमा हप्ता (GST) रुपयांमध्ये
१ लाख	१०७१३	६ लाख	४६१८३
२ लाख	१९७९०	७ लाख	४८२८२
३ लाख	२३४३६	८ लाख	५०१८९
४ लाख	२९०१६	९ लाख	५३४३४
५ लाख	३५८९४	१० लाख	६३२६५

१८. सामान्य आदेश क्र. २० (क) च्या तरतूदी - (फक्त कर्मचाऱ्यांबाबत)

१८.१ वैद्यकीय सुविधा - कार्यरत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता सर्वसाधारण आदेश क्र. २०(क), दि.१७/०७/१९६३ मधील तरतुदीनुसार देण्यात येणारा लाभ पूर्वीप्रमाणेच चालू राहील, त्यात कुठलाही बदल करण्यात आलेला नाही. मात्र कर्मचाऱ्यांस रु. १०.०० लाखांपर्यंत (Rs. 05 Lakhs BSI + Rs. 05 Lakhs CISI) वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा लाभ सुरुवातीस MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy द्वारेच घ्यावा लागेल. कर्मचाऱ्यांकरीता स्वत:साठी रु. १०.०० लाखांपेक्षा जास्त झालेल्या प्रत्यक्ष वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी सामान्य आदेश क्र.२० (क) प्रमाणे लाभ देय राहील.

मात्र, सदर प्रकरणी केवळ कर्मचाऱ्यांकरिता वैद्यकिय उपचारासाठी झालेल्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम ही विमा कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात आलेल्या रकमेपेक्षा जास्त असल्यास अशा प्रकरणात स.स्था.आ.क्र. ३७७, दि. ३०.०८.१९५८ चे सुधारपत्र क्र.१२, दि. १२.०२.१९९८ व सा.आ.क्र. २० (क) दि.१७.०६.१९६३ मधील तरतुदीच्या अधीन राहुन संबंधीत सक्षम अधिकारी प्रकरणपरत्वे निर्णय घेतील.

१८.२ वैद्यकीय अग्रीम -

अ) **कर्मचाऱ्यांना कामावर असताना अपघात झाल्यास** अथवा तातडीच्या प्रसंगी ज्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले ते रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी Medi Assist कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये नसेल तर विद्युत केंद्राकरीता कल्याण अधिकारी/सहा. कल्याण अधिकारी व अन्य कार्यालयांच्या बाबतीत संबंधीत विभागातील मानव संसाधन विभाग प्रमुखांने कर्मचाऱ्याच्या सदर प्रकरणाची माहिती Medi Assist (TPA) कंपनीस दूरध्वनीद्वारे **(MSEB Mediclaim Help Line No. ०१२०-६९३७३४०)** देवून २४ तासांच्या आत प्राथमिक दावा / सुचनांच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांचे नाव, भ.नि.नि. क्रमांक, रुग्णालयाचे नावं व पत्ता इ. माहितीचा ईमेल देखील msebmediclaim@mediassist.in यावर पाठवावा.

ब) त्यानंतर, स.स्था.आ.क्र.३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि. १२.०२.१९९८व सा.आ. क्र २०(क)दि.१७.६.१९६३ तसेच सुधारपत्र क्र. ६६ दि. १४.१०.१९९७ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकारी यांनी प्रकरण परत्वे कर्मचाऱ्यास वैद्यकीय उपचारासाठी अग्रीम रक्कम मंजूर करावी.

क) कर्मचाऱ्यास वरील प्रकरणी वैद्यकीय अग्रीम महानिर्मिती कंपनीकडून मंजूर करण्यात आला असल्याची सुचना Medi Assist (TPA) कंपनीस ईमेलद्वारे msebmediclaim@mediassist.in द्यावी.

ड) अप्राणांतिक अपघाताच्या अथवा इतर तातडीच्या आजारांच्या घटनेमध्ये प्रकरणपरत्वे रुग्णालयास कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारासाठी कंपनीकडून अग्रीम रक्कम दिलेली असल्यास कर्मचाऱ्यांने रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यानंतर तातडीने वैद्यकीय प्रतिपूर्ती प्रस्ताव संबंधीत कार्यालयाकडे सादर करावा. संबंधीत कार्यालयाने सदर प्रस्तावासोबत वैद्यकीय अग्रीम म्हणून रुग्णालयास अदा केलेल्या रक्कमेच्या पावतीची छायांकित प्रत व संबंधीत कार्यालयाचा बँक खाते क्रमांकासह **IFSC Code** ची माहिती कार्यालयाच्या Cancelled Cheque सह देवून सदर प्रकरणी मंजूर होणारी रक्कम कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठीचे स्वतंत्र पत्र जोडून प्रस्ताव कार्यालय प्रमुखामार्फत Medi Assist (TPA) कंपनीकडे पाठवावा. Medi Assist कंपनीकडून या प्रकरणी मंजूर रक्कम संबंधीत कार्यालयाच्या बँक खात्यावर जमा होईल, त्यानंतरच संबंधीत कार्यालयाने अग्रीम/वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा. सदर रक्कमेच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीबाबत संबंधीत कार्यालयाच्या मानव संसाधन विभाग प्रमुखाने Medi Assist कडे पाठपुरावा करावा.संबंधीत विद्युत केंद्र/विभागीय कार्यालयातील उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/कल्याण अधिकारी/सहा.कल्याण अधिकारी यांचे सहकार्य घ्यावे.

इ) प्राणांतिक अपघाताच्या घटनेमध्ये अथवा वैद्यकीय उपचाराप्रसंगी दुर्दैवाने मृत्यु झाल्यास अग्रीम रक्कम मंजूर करुन रुग्णालयास सदर रक्कमेचा धनादेश अदा केला असल्यास अशा प्रकरणी वैद्यकीय अग्रीम/वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण होईपर्यंत कर्मचाऱ्यांच्या अवलंबितास तितक्या रक्कमेची देयके अदा करण्यात येवू नये.

<u>१८.३ वैद्यकीय प्रतिपूर्ती</u> -:

- कर्मचारी/कुटुंबीयाने Medi Assist (TPA) कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालयामध्ये उपचार घेतले नसतील व सदर रुग्णालय कॅशलेस मेडीक्लेमसाठी नसेल तर कर्मचारी / कुटुंबातील सदस्यांने Medi Assist (TPA) कंपनीकडे **MSEB Mediclaim Help Line No. 0120-6937340** यावर दुरध्वनीद्वारे अथवा ईमेलद्वारे २४ तासांच्या आत प्राथमिक दाव्याबाबत १८.२ च्या 'अ' मध्ये नमूद केल्यानुसार सुचना द्यावी. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर तातडीने झालेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव Medi Assist (TPA) कंपनीकडे प्रतिपूर्ती दावा कार्यपध्दतीमध्ये व Medi Assist (TPA) कंपनीच्या संकेतस्थळावर नमूद केल्यानुसार योग्य ती सर्व कागदपत्रे जोडून संबंधीत कार्यालय व समन्वय अधिकारी (Nodal Officer) यांचेमार्फत पाठविणे बंधनकारक आहे.
- सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर Medi Assist (TPA) कंपनीकडून या योजनेच्या अटी व शर्तीच्या अनुषंगाने रु. १०.०० लाख मर्यादेपर्यंत वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कम मंजूर केली जाईल. सदर रक्कम कर्मचाऱ्याने अथवा अवलंबितांने प्रस्तावासोबत दिलेल्या Cancelled Cheque सह **IFSC Code** नुसार बँकेच्या खात्यावर Medi Assist (TPA) कंपनीकडून परस्पर वर्ग करण्यात येईल.
- कार्यरत कर्मचाऱ्यास कामावर असताना अपघात झाल्याप्रकरणी अथवा तातडीच्या प्रसंगी कर्मचाऱ्यास वैद्यकीय अग्रीम अदा केला असल्यास १८.२ च्या 'ड' व 'इ' मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करावी.
- उपरोक्त प्रकरणी वैद्यकीय उपचारासाठी **फक्त कर्मचाऱ्यांसंदर्भात** प्रत्यक्षात झालेल्या एकूण खर्चाची रक्कम ही रु. १०.०० लाख (Rs. ०५.०० Lakhs BSI + Rs. ०५.०० Lakhs CISI) यापेक्षा जास्त असल्यास सदर प्रकरणी स. स्था. आ. क्र. ३७७, दि. ३०.८.१९५८ चे सुधारपत्र क्र. १२, दि.१२.०२.१९९८ व सा.आ. क्र २० (क) दि.१७.६.१९६३ मधील तरतूदीच्या अधीन राहून संबंधीत सक्षम अधिकाऱ्यांनी वैद्यकीय प्रतिपूर्ती मंजूर करुन वैद्यकीय प्रतिपूर्ती रक्कमेचा लेखा पूर्ण करावा.

<u>१८.४ महानिर्मिती कंपनी मान्यताप्राप्त रुग्णालय</u> -: मेडीक्लेम योजनेकरिता नियुक्त केलेल्या TPA च्या सुचीवरील सर्व मान्यताप्राप्त रुग्णालयांचा समावेश सामान्य आदेश क्र. २० (क) सुचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहेत. त्यानुसार यावर्षीच्या MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy २०२४-२५ करिता Medi Assist Health Care Services या

कंपनीची TPA म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांचा कालावधी दि.२६.१०.२०२४ ते दि. २५.१०.२०२५ पर्यंत आहे. त्यामुळे Medi Assist (TPA) च्या यादीमधील Cashless करिता असलेली सर्व रुग्णालये ही महानिर्मिती कंपनीची मान्यताप्राप्त रुग्णालये म्हणून उपरोक्त कालावधीसाठी राहतील.

१८.५ कर्मचाऱ्याच्या वैद्यकीय उपचारापोटी या योजनेतंर्गत उपलब्ध असलेली विमा रक्कम रु.१०.०० लाख (Rs. 05 Lakhs BSI + Rs. 05 Lakhs CISI) कंपनीच्या कार्यरत कर्मचाऱ्यासाठी खर्च झालेली असल्यास व तद्नंतर कर्मचाऱ्यांवर अवलंबित असणाऱ्या ०५ सदस्यीय कुटुंबियांपैकी कुठल्याही व्यक्तीस उपचाराची आवश्यकता असल्यास अशा प्रकरणी कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांकरिता मुळ राशीभूत विमा रक्कम रु.०५.०० लाखापर्यंतच्या वैद्यकीय विम्याचा लाभ एक विशेष बाब म्हणून उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

याकरिता, संबंधीत कार्यालयाने विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंता यांच्यामार्फत तसेच विभागीय कार्यालयाच्या विभाग प्रमुखाने त्याबाबतचा प्रस्ताव मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, सांघिक कार्यालय, मुंबई यांचेकडे पाठवावा. सदर प्रस्तावास मा.संचालक (वित्त) हे कार्यकारी संचालक (मासं) व मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांचेशी विचारविनिमय करुन मंजूरी देण्यासाठीचे सक्षम अधिकारी राहतील.

१९. अधिकारी/कर्मचारी व कुटुंबियांच्या सुविधेकरिता दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. व **Medi Assist (T.P.A.)** यांचे मार्फत सर्व विदयुत केंद्र/सांघिक कार्यालयात Medi Assist (TPA) कंपनीचा प्रतिनिधी समन्वय अधिकारी (Nodal Officer) म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहेत. कर्मचाऱ्यांनी MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy २०२४-२५ संदर्भातील अडचणी सोडविण्याकरिता या समन्वय अधिकाऱ्यांची मदत घ्यावी.

कर्मचाऱ्यांना **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy २०२४-२५** संदर्भात स्पष्टीकरण, माहिती किंवा रुग्णालयात दाखल होण्यासाठी अथवा वैद्यकीय प्रतिपूर्तीचा दावा दाखल करण्यासाठी करावयाच्या प्रक्रियेकरिता मदतीची अथवा चौकशीची गरज असल्यास कर्मचारी अथवा त्याचे कुटुंबिय **Medi Assist (T.P.A.)** कंपनीच्या **बहुभाषीक ग्राहक सेवा केंद्राशी खाली नमूद केल्यानुसार संपर्क / संवाद करु शकतात.**

- **सर्व साधारण चौकशी व कॅशलेस सुविधेच्या सवलतीसाठी हेल्पलाईन क्र. 0120-6937340**
- **रुग्णालयात दाखल झाल्याची सूचना देण्यासाठी ईमेल - msebmediclaim@mediassist.in**

Medi Assist कंपनीसोबत पत्रव्यवहार व वैद्यकीय प्रतिपूर्तीचे दावे दाखल करण्यासाठीचा पत्ता

Medi Assist Health Care TPA Pvt.Ltd
माणिकचंद आयकॉन सी विंग, पहिला मजला,
ढोले पाटील रोड, पुणे- ४११००१.

सदर परिपत्रक महानिर्मिती कंपनीच्या **https://esevarth.mahagenco.in या संकेतस्थळावर** Employee Portal अंतर्गत Mediclaim येथे उपलब्ध असून त्याची मुद्रांकित प्रत प्रसारीत करण्यात येणार नाही.

सोबत:- सहपत्र.

(पी. एल. वारजुरकर)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रति - (ई-मेलद्वारे)
महानिर्मिती कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर : - (ई-मेलद्वारे)
१. मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि. मंडळ सूत्रधारी कं. मर्या, मुंबई.
२. मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती, सांघिक कार्यालय, मुंबई.
३. संचालक (वित्त), म.रा.वि. मंडळ सूत्रधारी कं. मर्या, हॉंगकॉंग बँक इमारत, मुंबई.
४. संचालक (वित्त/संचलन/प्रकल्प/इंधन), महानिर्मिती, सांघिक कार्यालय, मुंबई.
५. सर्व कार्यकारी संचालक, महानिर्मिती, सांघिक कार्यालय, मुंबई.

MAHAGENCO

MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO.LTD.
(Formerly : Maharashtra State Electricity Board)

Additional Top up Premium Option form for Mediclaim Policy 2024-25

Declaration for Top Up Premium of MSEB HCL Group Mediclaim Policy 2024-25
For MSPGCL EMPLOYEE ONLY

Name of Employee: - ______________________
CPF No. :- ______________________
SAP ID :- ______________________
Designation :- ______________________
Place of Working :- ______________________
Mobile No :- ______________________
Date :- ______________________

I am interested to opt for Additional Top Up Mediclaim Policy Premium under MSEB HCL Group Mediclaim Policy 2024-25 and authorize concerned Pay-Bill Officer for deduction of this amount in November - 2024 Salary, as Yes in Below premium table.

Additional Top Up Premium for above Rs. 10.00 Lacs (BSI Rs. 5.00 L + Compulsory Increased Sum Insured of Rs. 5.00 L= Rs.10.00L)	Premium with GST (Rs.)	Mark as Yes (✓)
1 Lac	10,713/-	
2 Lacs	19,790/-	
3 Lacs	23,436/-	
4 Lacs	29,016/-	
5 Lacs	35,894/-	
6 Lacs	46,183/-	
7 Lacs	48,282/-	
8 Lacs	50,189/-	
9 Lacs	53,434/-	
10 Lacs	63,265/-	

Signature of Employee/Officer

Note:-1. If, employee is interested for deduction of above premium in November 2024 Salary for Additional Top Up, then consider the same.
2. Employee will submit declaration form to the Concerned pay-bill officer by dt. 22.11.2024 before noon.

ऑनलाईन पध्दतीने अवलंबितांची नावे वैद्यकीय विमा योजनेत समाविष्ठ करण्याकरीता कार्यपध्दती

Mahagenco Site

↓

SAP Dashboard

↓

User ID

↓

Password

↓

Dashboard Open

↓

Select Tiles माझा परिवार
(For Mediclaim)

↓

Fill in the Blank
Employee Name
Automatic येईल

↓

Dependent ची नावे चेक करावी

↓

Submit

↓

Relationship Acknowledge